Since 1917

॥ सकल जनांसी आधारु ॥

THE KARAD URBAN
CO-OPERATIVE BANK LTD., KARAD
(SCHEDULED BANK)

Centenary Celebrated Bank

REF. NO.

DATE : - 3 APR 2020

**प्रिय कर्जदार बंधू-भगिनींनो,**

**विषय :- कर्ज हप्ता व व्याज परतफेडीसाठी दिलेल्या विशेष मुदतीबाबत.**

**सस्नेह नमस्कार,**

COVID-19 (कोरोना) च्या जागतिक महामारीचा परिणाम अनेक देशांवर झाला आहे. भारत सरकारनेदेखील दि.२४ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात २१ दिवसांसाठी लॉकडाऊन केल्यामुळे जीवनावश्यक सेवा-सुविधा वगळता सर्वच उद्योगधंदे, दुकाने पूर्णत: बंद आहेत. परिणामी प्रत्येकाच्या उत्पन्नावर विपरित परिणाम झालेला आहे. प्रत्येक उद्योगव्यवसायाच्या तसेच वैयक्तिक आर्थिक गरजा भागविण्यासाठी बँकांकडून अर्थसाहाय्य घेतले जाते. बँकेने आपणास वित्तपुरवठा केलेला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कर्ज परतफेडीसाठी येणाऱ्या अडचणींचा विचार करून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मुदत कर्जासाठी माहे मार्च, एप्रिल आणि मे २०२० अशा तीन महिन्यांसाठी कर्ज हप्ता व व्याज परतफेडीसाठी तसेच कॅश क्रेडीट कर्जासाठी माहे मार्च, एप्रिल आणि मे २०२० या तीन महिन्यांसाठी कर्जाचे व्याज भरण्यासाठी विशेष बाब म्हणून विश्रांती कालावधी (Morotorium Period) देण्याबाबत सर्वच बँकांना आवाहन केले आहे. बँकेच्या मा.संचालक मंडळाने या आवाहनास प्रतिसाद देत कर्ज खात्यांच्या बाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निश्चित केले आहे.

**१) मुदत कर्ज :**

अ) मुदत कर्जाच्या बाबतीत मार्च, एप्रिल व मे २०२० या तीन महिन्यांची व्याजाची रक्कम कर्ज खात्यावर नावे करून मुद्दल रकमेची बाकी वाढविण्यात येईल व आपल्या कर्जाची मुदत तीन महिन्याने वाढविण्यात येईल.

ब) दि.२९ फेब्रुवारी २०२० रोजी कर्ज परतफेड तक्त्यानुसार (Repayment Schedule) असणारी बाकी आणि विश्रांती कालावधीमधील दि.३१ मे २०२० अखेर होणाऱ्या व्याजाची रक्कम एकत्रित करून मुद्दल निश्चिती होईल आणि कर्जाचा उर्वरित कालावधी (विश्रांती कालावधीसह) विचारात घेऊन कर्ज परतफेडीसाठी हप्त्यांची पुनर्रचना केली जाईल. त्यामुळे हप्त्यामध्ये अल्पशा रक्कमेने वाढ होणार आहे.

क) जून २०२० पासून नवीन मुद्दल हप्ता आणि होणाऱ्या दरमहा व्याजाची नियमितपणे परतफेड करावी लागेल.

ड) विश्रांती कालावधीमुळे आपली कर्ज परतफेड मुदत तीन महिन्यांनी वाढणार आहे.

.. २ ..

६

REF. NO. DATE :



**२) कॅश क्रेडीट कर्ज :**

- अ) कॅश क्रेडीट कर्ज खात्यांच्या दि.१ मार्च २०२० ते दि.३१ मे २०२० या तीन महिन्यांच्या कालावधीत नावे पडणाऱ्या व्याज रक्कमे इतकी कॅश क्रेडीट कर्जाची मर्यादा (Limit) व उचलपात्र मर्यादा (Drawing Power) दि.३० जून २०२० अखेर वाढविण्यात येईल.
- ब) माहे मार्च, एप्रिल व मे २०२० या तीन महिन्यांच्या कालावधीत नावे पडलेले व्याज आपणास दि.३० जून २०२० अखेर एकरकमी भरावे लागेल.
- क) कॅश क्रेडीट कर्जाची मर्यादा (Limit) व उचलपात्र मर्यादा (Drawing Power) दि. ३० जून २०२० पासून पूर्ववत होईल.

**आपल्याला या विश्रांती कालावधीची आवश्यकता नसेल तर मूळ कर्ज मंजुरी पत्रातील अटीनुसार व निश्चित केलेल्या परतफेड तपशीलानुसार (Repayment Schedule) आपण कर्जाची नियमित परतफेड करू शकता. याबाबत आपण संबंधित शाखेस तशी कल्पना दिल्यास कार्यवाही करणे सोयीचे होईल.**

माहे फेब्रुवारी २०२० अखेरचे देय असणारे सर्व हप्ते नियमित भरले असतीलच. परंतु काही कारणाने फेब्रुवारी २०२० अखेर आपण कर्जाचे हप्ते भरू शकला नसाल तर ती रक्कम लवकरात लवकर भरण्याची व्यवस्था करावी, म्हणजे भविष्यात कर्ज हप्ता रक्कम परतफेडीचा अतिरिक्त ताण आपल्यावर येणार नाही.

लॉकडाऊनमुळे संपर्क साधनांवर आलेल्या मर्यादांमुळे इ-मेल किंवा व्हॉटस्अप्च्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधत आहे. कोरोना विरुद्धच्या लढ्यात आपण सर्वांनी आपली एकजूट कायम ठेवून लवकरात लवकर आलेल्या या आपत्तीवर मात करू या आणि त्याचबरोबर भविष्यकाळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्नांची जोड देऊ असे आवाहन याप्रसंगी करतो.

सदरच्या पत्रात नमूद केलेल्या कार्यवाहीमध्ये काही बदल/सुधारणा झाल्यास आपणास यथावकाश कळविण्यात येईल. आपल्याला सदर कार्यवाहीच्या अनुषंगाने काही शंका/अडचणी असतील तर, श्री.गिरीश सिंहासने महाव्यवस्थापक (कर्ज विभाग) यांच्याशी भ्रमणध्वनी क्र. ७३५०० १०७२२ यावर संपर्क साधावा ही विनंती.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षांसह...

आपला स्नेहांकित,

( सीए. दिलीप गुरव )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**